# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०७/०६/२०१९
## दि.०६/०६/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मुंढवा पो स्टे १७२/१९,भादविक ३०२,३४ |
| **फिर्यादी** | विवेक नामदेव वाघमारे,वय-४४,रा.पंचशील नगर,घोरपडी गाव,पुणे |
| **आरोपी** | १.गणेश सुर्यकांत जाधव,वय-२९,रा.व्यंकटेश सोसा.घोरपडी गाव,पुणे २.विवेक ऊर्फ पप्पु सुर्यकांत जाधव,वय-३१,रा.बिल्डींग नं.५९६,रेल्वे वसाहत घोरपडी गाव,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०६/०६/२०१९ रोजी पहाटे ०२/४५ वा. राजेंद्र डेअरी जवळ,घोरपडी गाव,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे विकास नामदेव वाघमारे,वय-४२,रा.सदर यांचे भाऊ असुन,नमुद वेळी व ठिकाणी विकास वाघमारे याचे यातील नमुद इसमांचे नातेवाईक असलेल्या एका महिले सोबत ओळख असल्याचे कारणावरुन,विकास याचे डोक्यावर फरशीने वार करुन,त्यास गंभीर जखमी करून त्याचा खुन केला आहे. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पो.निरी. भोसले ९८२३५ २०१०१ |

**२**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बंडगार्डन पो स्टे २२१/१९,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | अनुज सरोज,वय-२०,रा.साई सोसा.वाघोली,पुणे |
| **आरोपी** | दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०६/०६/२०१९ रोजी १४/१५ वा. पुणे स्टेशन सिग्नल चौकात बंडगार्डन पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे पुणे रेल्वे स्टेशन येथे आले असता,यातील नमुद दोन अनोळखी इसमांनी फिर्यादी यांना तुम्हाला कमी पैशामध्ये रिझर्वेशन करुन देतो असे बोलुन,फिर्यादी यांचेकडील कापडी सॅक मागितली. त्यावेळी त्यांनी ती देण्यास नकार दिला असता,सदर इसमांनी जबरदस्तीने फिर्यादी यांचेकडील मोबाईल व २० हजार रूपये रोख रक्कम असा एकुण २४,०००/- रु किचा ऐवज सॅकसह घेवुन गेले आहेत. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. ए.एस.ठोंबरे ९७६४००२८४१ |

**३**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ४१५/१९,भादविक १४२,१४३,१४४,१४६,१४७,१४८,३२४,आर्म अॅक्ट कलम ४(२५), क्रिमनल अमेडमेंट अॅक्ट ७ |
| **फिर्यादी** | विपुल पंडित,वय-१९ वर्षे,रा.सुदंरनगर,मांगडेवाडी,कात्रज,पुणे |
| **आरोपी** | १.किरण बाबुराव चव्हाण,वय-२१,रा.गुजरवाडी फाटा,कात्रज,पुणे २.सोहेल खलीत सैय्यद, वय-२०,रा.संतोषनगर कात्रज,पुणे (अटक) व इतर सात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०५/०६/२०१९ रोजी २१/५० वा. जाधवनगर,मांगडेवाडी,कात्रज,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमां मध्ये जाधवनगर,मांगडेवाडी,कात्रज,पुणे येथे कार्यक्रम मध्ये नाचण्याच्या कारणावरुन भांडणे होवुन त्यांनी आपसात धारदार हत्याराचे सहाय्याने भांडणे करून,तेथील उभ्या असलेल्या मोटार सायकली व टेम्पो यांचे नुकसान केले आहे. तसेच फिर्यादी व त्यांचा भाऊ अतुल रमेश पंडीत तसेच वस्तीतील १.अस्मिता अनिल शिंदे,रा.सुंदरनगर,मांगडेवाडी, कात्रज,पुणे २.रामा किसन हवाले यांना सदर इसमां मधील भांडणाचा काहीएक संबंध नसताना तेथे घडलेल्या भांडणाचा राग मनात धरुन विनाकारण धारदार हत्याराने मारून जखमी केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.एस.लाड ९७६४००२८४१ |

४

**पो.स्टे.गुरनं./कलम** सहकारनगर पो स्टे ३५०/१९,भादविक ३२४,१४३,१४४,१४७,१४९,३२३,५०४,५०६

**फिर्यादी** मनोज ढावरे,वय-२३ वर्षे,रा.तळजाई वसाहत,पद्मावती,सहकारनगर,पुणे

**आरोपी** १.धीरज रंगनाथ आरडे,वय-२२ वर्षे, २.राजु उर्फ डड्या संजय लोंढे,वय-२१ वर्षे,सर्व,रा. तळजाई वसाहत,पद्मावती,पुणे (अटक) व इतर पाच

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०४/०६/२०१९ रोजी २३/०० वा. बदाम चौक,पद्मावती,तळजाई वसाहत,सहकारनगर,पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी हे त्यांची बहिण, मेहुणी व मित्र सुरज नारायण अडागळे यांचेसह त्यांचे वस्तीत राहणारी त्यांची मावशी सौ.सिंदुबाई दादुखुडे हिचेकडुन त्यांचे राहते घरी जात असताना,बदाम चौक येथे आलो असता,सदर इसमांनी अचानकपणे फिर्यादी यांचे जवळ येवुन,तु लय भाई झालास काय? तुला माज आलाय काय? असे म्हणुन दि.२५/०५/२०१९ रोजी झालेल्या भांडणाचा राग मनात धरून, फिर्यादी व सुरज अडागळे यास शिवीगाळ करून,सिमेंटच्या ब्लॉकने,दगडाने,काठीने मारुन तसेच लाथा-बुक्क्यांनी मारहाण करुन त्यांना जखमी करुन,जिवे मारण्याची धमकी दिली आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. एन.एच.खामगळ ९८८१३३५५५६

५

**पो.स्टे.गुरनं./कलम** कोरेगांव पार्क पो स्टे १८७/१९,भादविक ४०७,३७९,३४

**फिर्यादी** एक पुरूष,वय-३३ वर्षे,रा.कोरेगाव पार्क,पुणे

**आरोपी** एका नामांकीत कुरीयर कंपनीचे पदाधिकारी (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०९/०५/२०१९ ते दि.१८/०५/२०१९ रोजी दुपारी १२/०० वा.चे कालावधीत अंबाला, हरयाणा राज्य ते पुणे,कोरेगाव पार्क,लेन नं.८ चे दरम्यान

**तपशिल** यातील फिर्यादी यांचे पत्नीचे माहेर अंबाला येथे आहे. फिर्यादी यांची पत्नी यांचे ऑफीस मधील सहकारी हिचे मुलीचे लग्न असल्याने,त्यांचेसाठी तसेच फिर्यादी यांचेसाठी तसेच इतर नातेवाईकांसाठी फिर्यादी व त्यांचे पत्नीने अंबाला येथे मिक्सर,ग्राईंडर,पंजाबी ड्रेस मटेरियल असा माल खरेदी केलेला होता. तो सर्व माल तीन बॉक्समध्ये पॅक करून,खाजगी नामांकीत कुरीयरने दि.०९/०५/२०१९ रोजी पुणे येथे मागविण्यात आलेला होता. त्यासाठी फिर्यादी यांना कुरीयरचा ट्रॅकींग नंबर चुकीचा दिला गेला होता, तो दुरूस्त करून सदरचे तीन बॉक्स फिर्यादी यांना कुरीअरचे कंपनी मार्फत दि.१८/०५/२०१९ रोजी फिर्यादी यांचे पत्त्यावर पोहोच झाला. सदरचे दोन बॉक्स मधील माल हा व्यवस्थित होता. परंतु तिसरा बॉक्स फोडत असताना त्या बॉक्सला केलेली पॅकींग वेगळी दिसली म्हणून फिर्यादी यांना संशय आला व तो बॉक्स फोडून पाहता, त्यामधील ५७,२८८/- रू किचा माल त्यामध्ये एकूण २२ पंजाबी ड्रेसच्या वेग-वेगळया रंगाच्या नवीन ड्रेस मटेरियल, प्रत्येक मटेरियलचे कापड वेग-वेगळया प्लास्टिक पिशवीत ठेवलेल्या तसेच त्यामध्ये पिंक कलरची नवीन डिझायन साडी व एक ब्लाऊज पिससह माल गायब झाल्याचे दिसुन आले. त्याबाबत फिर्यादीं यांनी दिघी,पुणे येथील कुरीयर कंपनीचे कार्यालयात जावून चौकशी केली असता,त्यांनी फिर्यादीस खात्रीशीर काहीएक सांगितलेले नाही. त्यामुळे फिर्यादी यांचे बॉक्स मधील सदरचा माल हा कोणीतरी काढुन घेतल्याचे खात्री झाल्याने,फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून वरीलप्रमाणे गुन्हा दाखल केलेला आहे.

**त.अंमलदार** वरिष्ठ पो.निरी. मदन बहादुरपुरे ९८२२४०३८६६

६

**पो.स्टे.गुरनं./कलम** अलंकार पो स्टे १३५/१९,भादविक ४१९,४२०,३४,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड)

**फिर्यादी** एक महिला,वय-२६ वर्षे,रा.चितलसर,मानपाडा,ठाणे

**आरोपी** अज्ञात दोन मोबाईलधारक (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** माहे फेब्रुवारी २०१७ पासुन ते दि.०३/०६/२०१९ रोजीचे कालावधीत ऑनलाईन माध्यमाव्दारे

**तपशिल** यातील नमुद अज्ञात दोन मोबाईलधारक यांनी संगनमत करून,ॲमेझॉन इंडीया कंपनीची फसवणुक करण्याचे हेतुने आणि पुर्व नियोजित तयारी करुन,खोटी नावे असलेल्या व्यक्ती व त्याचे मोबाईल नंबर त्यांच्या सहका-यांसह सदर कंपनीस ऑर्डर दिली. त्यानंतर सदर इसमांनी नकली फोन आणि इतर उत्पादनांच्या बदल्यात अस्सल उत्पादनाच्या किंमतीच्या रक्कमेची परतफेड करण्यासाठी भाग पकडुन,ॲमेझॉन इंडीया कंपनीची सुमारे ११ लाख ८९ रूपये रक्कमेची फसवणुक केली आहे.

**त.अंमलदार** पो.निरी.(गुन्हे) आर.टी.तटकरे ८३२९४७९९२०

७

**पो.स्टे.गुरनं./कलम** येरवडा पो स्टे ४१२/१९,भादविक ४०६,४२०

**फिर्यादी** एक पुरूष,वय-४० वर्ष,रा.विठ्ठलनगर,वडगांव-शेरी,पुणे

**आरोपी** अज्ञात (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** माहे मार्च २०१९ ते दि.०५/०६/२०१९ रोजीपर्यंत अशोक प्लाझा बिल्डींग समोर नगर रोड, विमाननगर,पुणे तसेच नळ स्टॉप कोथरुड,पुणे या ठिकाणी

**तपशिल** फिर्यादी यांना फ्लॅट खरेदी करणेसाठी ३० लाख रुपये कर्जाची रक्कम मिळुन देतो असे सांगुन,फिर्यादी व त्यांचे पत्नीचा विश्वास संपादन करून,फायनान्स लिमीटेड या कंपनीचे फिर्यादी यांचे नावाचे २७,५०,०००/- रुपये कर्जाचे मंजुरी पत्र नळ स्टॉप,कोथरूड येथे बोलावुन घेवुन त्यांना दाखवुन,कर्जाचे चार्जेस म्हणुन त्यांचेकडुन वेळोवेळी २,८९,०००/- रुपये चेकव्दारे व एनएफटीव्दारे मनी ट्रान्सफरव्दारे त्याचे फायनान्शिअल ॲन्ड सर्व्हिसेस या नावाने खाजगी बॅंकेतील खात्यावर घेतले. फिर्यादी यांनी त्यांचे कर्जाचे जमा झालेल्या रकमे बाबत विचारले असता,फियादी यांना उडवा-उडवीची उत्तरे देवुन,त्यांना कर्ज मिळवुन न देता फिर्यादी यांची २,८९,७००/- रूपयेची फसवणुक केली आहे.

**त.अंमलदार** म.पो.उप.निरी. मनिषा टुले ९९२३०७४२३१

८

**पो.स्टे.गुरनं./कलम** कोंढवा पो स्टे ४९५/१९,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड)

**फिर्यादी** एक पुरूष,वय-४९ वर्षे,रा.उंड्री,ता.हवेली,जि.पुणे

**आरोपी** अज्ञात मोबाईलधारक (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०१/०२/२०१९ रोजी सकाळी ११/०० ते १६/३० वा.चे दरम्यान फिर्यादीचे राहते घरी ऑनलाईन माध्यमाव्दारे

**तपशिल** यातील फिर्यादी यांनी ॲमनोरा मॉल येथे चित्रपटाचे बुकींग केले होते. त्यांनंतर फिर्यादी यांनी सदरचे बुकींग रद्द करावयाचे असल्याने,त्यांनी google application मध्ये book my show या साईटवरील अनोळखी मोबाईलधारकाचा मोबाईल नंबर प्राप्त करुन,त्यावर संपर्क करुन सदर इसमास बॅंकेतील खाते नंबरचे शेवटचे सहा डिजीट नंबर दिले असता,मोबाईल धारकाने फिर्यादी यांचे बॅंकेतील खात्यावरुन ५०,०००/- रुपये रकमेचे ऑनलाईन ट्रान्झेक्सन करुन,फिर्यादी यांची फसवणुक केली आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. पी.डी.देवकाते ९९६०३३६६४५

९

**पो.स्टे.गुरनं./कलम** खडक पो स्टे २४४/१९,भादविक ३५३,३३२,५०४,५०६,३४

**फिर्यादी** संजय दिघे, पो.हवा. खडक पो स्टे पुणे शहर

**आरोपी** १.सचिन सुखदेव गायकवाड,वय-४०,रा.कासेवाडी,भवानी पेठ,पुणे २.आसीफ अब्दुल शेख,वय-२९,रा. ६११,कासेवाडी,भवानी पेठ,पुणे ३.नजीर सलीम शेख,वय-२२,रा.कासेवाडी,पुणे (अटक)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०६/०६/२०१९ रोजी रात्रौ ००/५० ते ०१/३० वा.चे दरम्यान कासेवाडी पोलीस चौकी येथे

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे कर्तव्यावर असताना,भांडणाचा आवाज आल्याने बाहेर आले असताना,सदर ठिकाणी भांडणात मार खाणारे मुलास संरक्षणकामी चौकीचे आंत आणल्याचे कारणावरून,फिर्यादी यांना धक्का-बुक्की व दमदाटी करून, त्यांचेजवळील बेल्टने फिर्यादीचे उजवे हातातील मधील बोटास मारहाण करून दुखापत केली. तसेच चौकीतील खुच्या व टेबल अस्ताव्यस्त करून धमकी दिली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.एस.पांढरे ९८२३६६२४११ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**